# जगण्याचे साहस

लहरींसवे खेळावया गेलो सागरकिनारी
मऊशार रेतीत पाय रुतवलेन
उग्र लाटांच्या तडाख्यात आडवा-तिडवा झालो!

पावसाची रिमझिम ऐकण्या गेलो माळरानी
कृष्णमेघांच्या दाट छायेत राहिलो उभा
विजेचे रौद्र नर्तन पाहून भयकंपित झालो!

पक्ष्यांसवे भ्रमण करावया गेलो उंच पहाडी
माथ्यावरून नजर विस्फारली क्षितिजाकडे
अथांग सृष्टीमातेच्या तेजाने भोवळ येऊन पडलो!

कामिनीच्या गहिऱ्या डोळ्यांची पाहावयास गेलो जादू
नाजुक पापण्यांवरून अलगद घसरलोन
नजरेच्या चक्रीवादळात चिंध्या चिंध्या झालो

सोडून मळलेली सोपी वाट कुठकुठे भरकटलो
कुतुहल भोवले झालो चाव्यांनी जर्जर,
पण साहसाच्या शहाऱ्यांनी रोमांचित होत गेलो!

*By: Abhay B. Joshi*
*May 2013*